महाराष्ट्र विधानसभा

पहिले अधिवेशन, २०१८

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

गुरुवार, दिनांक ०८ मार्च, २०१८ / फाल्गुन १७, १९३९ (शके)

(१) आदिवासी विकास मंत्री
(२) उद्योग व खनिकर्म मंत्री
(३) उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री
(४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री
(५) सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री

} **यांचे प्रभारी विभाग**

प्रश्नांची एकूण संख्या - ४७

अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील नवेदर नवगाव ग्रामपंचायत हद्दीतील महावितरण कंपनीच्या एल.टी.वायर जीर्ण झाल्याबाबत

(१) * १०८५९८ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील नवेदर नवगाव ग्रामपंचायत हद्दीतील महावितरण कंपनीच्या एल.टी.वायर अनेक वर्षांच्या असून त्या जीर्ण झालेल्या असल्याने ग्रामपंचायतीमध्ये असलेल्या घरातील इलेक्ट्रीक वस्तूंचे वारंवार नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मेस्को पाडा येथील वीज खांब माहे जून, २०१७ रोजी पडल्याने सुमारे ७ महिने पथदिवे बंद असून दांडा येथील ग्रामपंचायत कार्यालयाजवळील रोहित्र डीपीचा खांब पूर्णपणे खराब झाल्यामुळे सदर रोहित्र पडून आर्थिक व जीवितहानी होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी शासनाने पाहणी केली आहे काय, त्यानुसार शासनाने एल.टी.वायर बदलण्याबाबत, पथदिवे सुरु करण्याबाबत व दांडा येथील रोहित्राची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच याप्रकरणी विभागाकडे पत्रव्यवहार करूनही अद्याप कोणतीही कार्यवाही न करणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) मेस्को पाडा व दांडा ही दोन ठिकाणे अलिबाग तालुक्यातील नवेदर नवगाव ग्रामपंचायत हद्दीत येत असून ती समुद्र किनाऱ्यालगत वसलेली आहेत. त्यामुळे तेथे वीज वाहिन्या व लोखंडी वीज खांब गंजण्याचे प्रमाण जास्त आहे.

(२) व (३) मेस्को पाडा येथे समुद्राच्या दिशेने बंदराकडे जाणाऱ्या रस्त्यालगत कोणतीही लोकवस्ती नसल्याने तेथे सिमेंटचे पथदिव्यांचे १४ खांब असून त्यावर फक्त पथदिव्यांचा फेज ओढला आहे व ग्रामपंचायतीने ६ खांबावर पथदिवे ब्रॅकेट बसविले आहेत व ते सुस्थितीत कार्यरत आहेत. या सिमेंटच्या पथदिव्यांच्या खांबांपैकी बंदरालगतचा म्हणजेच शेवटचा सिमेंटचा खांब माहे जून, २०१७ मध्ये पूर्णपणे झुकला होता. सदरचा खांब बदलून घेतला असल्याने पथदिव्यांचा प्रश्न निकाली निघाला आहे.

नवेदर नवगाव ग्रामपंचायतअंतर्गत सद्यपरिस्थितीत १५ लोखंडी खांब बुडालगत सडले असून ७.२ किमी लघुदाब वाहिनी गंजून जीर्ण झाल्या आहेत व त्या बदली करणे आवश्यक असल्याने पं.दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेअंतर्गत २३ लोखंडी खांब बदली करणे व देखभाल व दुरुस्ती योजनेत लघुदाब वाहिन्या बदली करणे ही कामे समाविष्ट केली असून सदरची कामे प्रगतीपथावर आहेत.

दांडा येथील नवेदर नवगाव ग्रामपंचायत कार्यालयाजवळील रोहित्र डी.पी चा एक लोखंडी खांब बुडालगत एक फुटापर्यंत सडलेला होता. पं. दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेअंतर्गत गंजलेले लोखंडी खांब बदलण्याचे प्रस्तावित केले आहे. तसेच रोहित्राच्या बुडालगत सडलेल्या लोखंडी खांबास दोन्ही बाजूस लोखंडी चॅनल बसवून मफिंग करुन मजबूत करण्याचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील अंगणवाड्यांचा वीजपुरवठा महावितरण कंपनीने खंडित केल्याबाबत

(२) * ११३४०० श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यांतील महावितरण कंपनीने जिल्हा परिषद शाळांसह अंगणवाड्यांना व्यावसायिक वीज दर आकारल्याने वीज देयके जास्त येत असल्याने ती भरणे आर्थिकदृष्ट्या अशक्य असल्यामुळे ३६ अंगणवाड्यांचा वीज पुरवठा खंडीत केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यातील शाळा व अंगणवाड्यांना घरगुती दराने विज आकारणी करण्याची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) विद्युत अधिनियम, २००३ मधील तरतुदीनुसार वर्गवारीप्रमाणे वीजदर निश्चित करण्याचे अधिकार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास आहेत. आयोगाच्या वीजदर आदेशानुसार जिल्हापरिषदेच्या शाळांना तसेच अंगणवाडयांना "व्यावसायिक" वीजदर लागू नसून "सार्वजनिक सेवा" या वर्गवारीचा वीजदर आकारण्यात येतो. चिपळूण तालुक्यातील २६ अंगणवाडयांचा वीज पुरवठा वीज देयक न भरल्याने कायमस्वरुपी बंद करण्यात आला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या दिनांक ३.११.२०१६ च्या वीजदर आदेशानुसार सार्वजनिक सेवा वर्गवारीतील ०-२०० युनिटपर्यंतचे वीजदर हे घरगुती वर्गवारीसाठीच्या १०१-३०० युनिटपर्यंतच्या वीज दरापेक्षा कमी आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सातारा जिल्हयातील ग्राहकांना महावितरण कंपनीकडून चुकीची वीज देयके देण्यात येत असल्याबाबत

(३) * ११२४८२ श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील म्हसवड व परिसरातील नागरिकांना महावितरण कंपनीकडून चूकीचे रिडींग घेतेले जाणे, मीटर बंद असतानासुध्दा सुमारे २५ ते ३० हजारापर्यंत घरगुती वीज देयके येत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हसवडमध्ये फिडरचे काम अनेक दिवसापासून मंजूर असूनही अद्याप सदर काम पूर्ण झाले नसून येथील वीज वितरण कंपनीतील रिक्त पदांमुळे देखील प्रशासकीय कामकाजावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सातारा जिल्हयातील ग्रामीण भागात शेतकऱ्यांना शेती पंपाची जोडणी वर्षानुवर्षे मिळत नसल्याने पिकांना पाणी देण्यास अडचण येत असल्यामुळे पाण्याअभावी पिके सुकू लागली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शेतकऱ्यांना प्रलंबित शेती पंपाची जोडणी देण्यासाठी निधीची तरतूद करणे, जिल्हयातील ग्राहकांच्या देयकांबाबतच्या तक्रारीं दूर करणे व म्हसवडमध्ये फिडरचे काम पूर्ण करुन रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सद्यस्थितीत मौजे म्हसवडसाठी कुठल्याही स्वतंत्र फिडरचे काम मंजूर नसल्यामुळे काम हाती घेण्यात आलेले नाही. परंतु म्हसवड शहरामध्ये एकात्मिक ऊर्जा विकास योजनेअंतर्गत कामे मंजूर असून सदरची कामे प्रगतीपथावर आहेत. म्हसवड शाखा कार्यालय येथे संबंधित रिक्त पदे बाहय स्त्रोताद्वारे भरण्यात आलेली आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) सातारा जिल्हयातील एकूण १४३८२ प्रलंबित शेतीपंप वीज जोडण्या देण्यासाठी रु.२८४.७२ कोटी निधी योजना प्रस्तावित आहे. वीज देयकांच्या तक्रारी वेळोवेळी दूर केल्या जात आहेत. म्हसवड शाखा कार्यालयांतर्गत माहे डिसेंबर, २०१७ मध्ये १६४ व जानेवारी, २०१८ मध्ये ९४ तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्यांचा निपटारा करण्यात आलेला आहे. म्हसवड येथे एकात्मिक ऊर्जा विकास योजनेअंतर्गत कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच रिक्त पदे बाहयस्त्रोत कर्मचाऱ्यांद्वारे भरण्यात आलेली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मंगरुळपीर (जि.वाशिम) तालुक्यातील मंगरुळपीर व शेलुबाजार कृषी उत्पन्न बाजार समितीने कमी भावाने सोयाबीन विकल्याने शेतक-यांना अनुदानापासून वंचित रहावे लागल्याबाबत

(४) * १०९५८८ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगरुळपीर (जि.वाशिम) तालुक्यातील मंगरुळपीर व शेलु बाजार कृषी उत्पन्न बाजार समिती येथे माहे ऑक्टोबर ते डिसेंबर, २०१७ या कालावधीत हमीभावापेक्षा कमी भावाने सोयाबीन विकणाऱ्या शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल २०० रुपये अनुदान शासनाने जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी १९९५ शेतकऱ्यांचे अनुदानाचे प्रस्ताव शासनाने अपात्र केल्याने अनुदानाची रक्कम ५२ लाख रुपये असून चुकीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांना अनुदानापासून वंचित रहावे लागले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शेतकऱ्यांना अपात्र करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या अपात्र शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१) होय.

(२), (३) व (४) नाही.

शासन निर्णय दिनांक १०.०१.२०१७ मधील अटी व शर्तीची पूर्तता केलेल्या शेतकऱ्यांना प्रति क्विंटल रुपये २००/- व जास्तीत जास्त २५ क्विंटल प्रति शेतकरी याप्रमाणे सोयाबीन अनुदान मंजूर केले आहे. त्यानुसार मंगरुळपीर व शेलू बाजार समितीमध्ये विक्री केलेल्या एकूण ९४३६ शेतकऱ्यांना रुपये २.६० कोटी अनुदान वाटप करण्यात आले आहे. तथापि, काही शेतकऱ्यांच्या कुटुंबातील व्यक्ती अथवा नातेवाईकांच्या नावे विक्री केली होती. ७/१२ उतारा नाही व बॅक खाते क्रमांक नसल्याने, त्यांचे अर्ज छाननी समितीकडून अपात्र ठरविण्यात आल्यामुळे त्यांना अनुदान अनुज्ञेय नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वरोती (ता.डहाणू, जि.पालघर) येथील वसतिगृहात एका विद्यार्थ्याचा झालेला मृत्यू

(५) * १०९९७५ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोती (ता.डहाणू, जि.पालघर) येथील शासकीय वसतिगृहात १६ वर्षीय विद्यार्थ्याचा दिनांक २५ डिसेंबर, २०१७ रोजी वसतिगृहाच्या पायरीवर झालेल्या मृत्यूची चौकशी करण्याबाबत समर्थन संस्थेने दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा.आदिवासी विकास मंत्री तसेच सचिव, आदिवासी विकास विभाग यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संशयास्पद मृत्यूबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, सदरहू अहवाल शासनास सादर झाला आहे काय,
(३) असल्यास, अहवालातील निष्कर्ष काय आहेत त्यानुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) डहाणू तालुक्यात वरोती येथे विभागाचे वसतीगृह नसून दिनांक २५ डिसेंबर २०१७ रोजी आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह, कासा, ता.डहाणू येथील वसतीगृहात प्रवेशित सचिन बाबू धुमाडा या विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची बाब खरी आहे.

या विद्यार्थ्याच्या मृत्युसंदर्भात चौकशी करण्याबाबत समर्थन या संस्थेने दि.१५.०१.२०१८ रोजी मा.मंत्री, आदिवासी विकास यांचेकडे निवेदन दिले होते.

(२) व (३) प्रस्तुत घटनेची प्रकल्पस्तरावर चौकशी करण्यात आलेली आहे.

कै.सचिन याचे आई-वडील संबंधित वसतीगृहाच्या भोजनठेकेदाराकडे कामाला आहेत. दि.२५.१२.२०१७ रोजी सचिनचे वडील हे नाश्त्यासाठी सकाळी ६.३० वाजता सर्व विद्यार्थ्यांना उठविण्यास गेले. त्यादरम्यान सचिनला उठविण्याचा प्रयत्न केला असता, सचिनकडून प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे त्यांनी वसतीगृहाचे गृहपाल यांना बोलवले. गृहपाल यांनी तात्काळ त्याला उपजिल्हा रूग्णालय, कासा येथे नेले असता, तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला मृत घोषित केले.

विद्यार्थ्याचे पालक यांनी त्यांच्या जबाबात सचिनच्या मृत्यूबाबत कोणावरही संशय नसल्याचे म्हटले आहे. तसेच या घटनेबाबत प्रथमदर्शनी वसतीगृह प्रशासन जबाबदार नसल्याचे दिसून आले आहे.

त्याचप्रमाणे शवविच्छेदनाच्या प्राथमिक अहवालामध्ये सदर विद्यार्थ्याचा मृत्यू विषारी द्रव किंवा पदार्थ खाल्यामुळे झालेला असावा, असे नमूद केले आहे. अंतीम अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सांगली जिल्हयातील इस्लामपूर, वाळवा व शिराळा तालुक्यात शेतीपंपासाठी पायाभूत सुविधांची उभारणी करण्याबाबत

(६) * १११६२३ श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील इस्लामपूर, वाळवा व शिराळा तालुक्यांत शेतीपंपासाठी पायाभूत सुविधा लागणारे ग्राहक अनुक्रमे ८७६, ५४३ व ३३३ इतके असून त्याठिकाणी उच्चदाब वाहिनी, लघू दाब वाहिनी, रोहित्रे यांची उभारणी करणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच शिराळा तालुक्यातील वाडीभागाई, अस्वलवाडी, कनधूर व पावलेवाडी या गावच्या शिवारात महावितरण कंपनीच्या विजतारांच्या घर्षणामुळे लागलेल्या आगीत जळालेल्या गवताची नुकसान भरपाई देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी सांगली जिल्हयाच्या पालकमंत्री यांना दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरणच्या गैरकारभारामुळे या चार गावातील शेतक-यांना सन २००९ पासून वारंवार आगीच्या घटनांना सामोरे जावे लागत असून शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(४) त्यानुसार इस्लामपूर, वाळवा व शिराळा तालुक्यांत शेतीपंपाच्या पायाभूत सुविधेसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत व जळालेल्या गवताची नुकसान भरपाई देण्याबाबत व वारंवार लागणाऱ्या आगीस प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) आगींच्या घटना होऊ नयेत याकरिता शिराळा तालुक्यातील या चार गावांसह महावितरण कंपनीकडून विद्युत वाहिनीच्या देखभाल व दुरुस्तीची कामे उदा. लोंबकळणाऱ्या तारा सुस्थितीत करणे, झुकलेले पोल सरळ करणे, वाहिनीस अडथळा करणाऱ्या झाडाच्या फांद्या तोडणे, पिन इन्सुलेटर पुन्हा बायडींग करणे इत्यादी कामे वेळोवेळी करण्यात येत आहेत.

(४) राज्यात मार्च, २०१८ अखेर पैसे भरुन प्रलंबित राहणाऱ्या संभाव्य २,२४,७८५ कृषिपंप ग्राहकांना उच्चदाब वितरण प्रणाली (HVDS) द्वारे वीज पुरवठा करण्यासाठी लागणारा रु. ५०४८.१३ कोटींचा प्रस्ताव महावितरण कंपनीमार्फत प्रस्तावित आहे. सदर योजनेअंतर्गत सांगली जिल्ह्यातील १८५९४ कृषीपंप ग्राहकांना वीजजोडणी देण्याकरिता रु.४१४.३५ कोटीचा समावेश करण्यात आला आहे.

नुकसान भरपाईसाठी लागणाऱ्या आवश्यक कागदपत्रांची पूर्तता संबंधितांकडून करुन घेण्यासाठी महावितरण कंपनीकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

तसेच अपघाताच्या घटना घडू नयेत याकरिता महावितरणच्या शाखा कार्यालय/उपविभागीय कार्यालय यांचेकडून वाडीभागाई, अस्वलवाडी, कणदूर या गावच्या हद्दीतील सर्व वाहिन्यांची योग्य ती दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

हरसुल (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) येथील आदिवासी मुलांच्या शासकीय वसतीगृहातील गैरसोयींबाबत

(७) * ११२५५६ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हरसुल (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक संचलित आदिवासी मुलांच्या शासकीय वसतीगृहात विविध समस्या असून मुलांना देण्यात येणारे जेवण निकृष्ट दर्जाचे असल्याने वसतीगृहातील मुलांनी दिनांक ०४ जानेवारी, २०१८ रोजी जेवण बंद आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेळेवर जेवण मिळत नसणे, नाश्ता म्हणून फक्त पोहे दिले जात असणे तसेच वसतिगृहात असणा-या विविध समस्या सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रकल्प अधिकारी, नाशिक यांचेकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने वसतीगृहाची पाहणी केली आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त पाहणीत वसतिगृहातील कोणत्या समस्या निदर्शनास आल्या आहेत व त्यानुषंगाने त्यांचे निराकरण करण्यासाठी पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) दि.०४.०१.२०१८ रोजी वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी जेवण बंद आंदोलन केल्याची बाब खरी नाही.
(२) वसतीगृहातील समस्यांबाबत विद्यार्थ्यांनी प्रकल्प अधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली नाही.

तथापि, दि.०५.०१.२०१८ रोजी दैनिक सकाळ या वृत्तपत्रात या वसतीगृहातील समस्यांसंदर्भात बातमी प्रसिध्द झाली होती.
(३) व (४) दि.०५.०१.२०१८ रोजी प्रसिद्ध झालेल्या बातमीच्या अनुषंगाने प्रकल्प कार्यालय, नाशिक येथील सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) यांनी हरसुल येथील मुलांचे व मुलींचे शासकीय वसतिगृहात भेट देऊन चौकशी केली आहे.

सदर चौकशीमध्ये विद्यार्थ्यांना जेवण वेळेवर न मिळणे, जेवण तिखट असणे, फलाहार नियमीत न मिळणे, पाण्याची समस्या इत्यादी बाबी निदर्शनास आल्या.

मात्र भेटीचे दिवशी वसतीगृहातील भोजन चव रजिस्टरमधील नोंदी तपासल्या असता जेवण चांगले मिळत असल्यासंबंधी विद्यार्थ्याच्या नोंदी आहेत.

भेटीच्या वेळी विद्यार्थ्यांच्या तक्रारींच्या अनुषंगाने सहाय्यक प्रकल्प अधिकारी, (शिक्षण) यांनी भोजन ठेकेदार व गृहपाल यांना विद्यार्थ्यांना दररोज शासन नियमाप्रमाणे फलाहार, नास्ता, अंडी पुरविणेसबंधी सूचना दिल्या. तसेच जेवण बनविणारे स्वयंपाकी बदलण्यात येतील असे भोजनठेकेदार यांनी सांगितले.

बोअरवेल सुरु केले असून पाण्याची समस्या सोडविली आहे. तसेच वसतीगृहाच्या इमारत दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांचेकडून अंदाजपत्रक तयार करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

केंद्र शासनाच्या श्यामाप्रसाद मुखर्जी राष्ट्रीय रुरबन अभियानांतर्गत मुक्ताईनगर तालुक्यास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(८) * ११३१८६ श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या श्यामाप्रसाद मुखर्जी राष्ट्रीय रुरबन अभियानांतर्गत (एन.आर.यु.एम) मुक्ताईनगर तालुक्याची आदिवासी उपयोजनेतंर्गत निवड करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजने अंतर्गत प्रस्तावित असलेल्या विकास कामांसाठी प्राधान्याने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०१७ व माहे जानेवारी, २०१८ मध्ये निवेदनाच्या माध्यमातून मा.आदिवासी विकास मंत्री यांच्याकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निधी तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय, केंद्र शासनाच्या राष्ट्रीय रुरबन अभियान अंतर्गत केंद्र शासनाने निवडलेल्या आदिवासी गावसमूहापैकी मुक्ताईनगर तालुक्यातून मुक्ताईनगर ग्रामपंचायत या गावसमुहाची निवड करण्यात आलेली आहे.

(२) होय.

(३) रुरबन अभियानांतर्गत मुक्ताईनगर तालुक्यातून मुक्ताईनगर ग्रामपंचायत ही एकच ग्रामपंचायत समाविष्ट असलेले गावसमुह आहे. सदर गावसमुहासाठी तयार करण्यात आलेल्या व मंजूर झालेल्या ICAP (एकात्मिक गावसमुह कृती आराखडा) व DPR (सविस्तर प्रकल्प अहवाल) मध्ये आदिवासी विकास विभागाच्या योजनांमधील विकास कामांचा समावेश नाही. त्यामुळे निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील बॉक्साईट उत्खननाने राधानगरी अभयारण्याचे अस्तित्व धोक्यात आल्याबाबत

(९) * ११२१८८ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी अभयारण्यातून हिंदाल्को कंपनीला वार्षिक ८ लाख ६४ हजार टन बॉक्साइट खोदाई आणि वाहतुकीचा परवाना देण्यात आलेला असून सदर कंपनीकडून गेली दोन वर्षे परवान्यापेक्षा जास्त उत्खनन आणि वाहतुक होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच अवजड यंत्रे आणि हजारो वाहनांची ये-जा होत असल्याने अभयारण्यातील प्राणी, पक्षी स्थलांतरीत होत असून दुर्मिळ वनस्पतींच्या बहुतांश प्रजाती नष्ट होऊ लागल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अभयारण्याच्या अस्तित्वाला यामुळे धोका निर्माण झाला असून अवैध व मर्यादेपेक्षा जास्त उत्खनन करणाऱ्या कंपनीची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अवैध बॉक्साईट उत्खनन करणाऱ्या कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच उत्खनन थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) खाणकाम योजना व पर्यावरण नाहरकतच्या मर्यादेपेक्षा जास्त उत्खनन झालेले नाही. त्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

परभणी (जि.परभणी) तालुक्यातील १३१ गावांतील पात्र लाभार्थ्यांना रमाई आवास योजनेंतर्गत घरकुल मिळण्याबाबत

(१०) * ११००५९ डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी (जि.परभणी) तालुक्यातील १३१ गावे रमाई आवास योजनेसाठी पात्र असून सदर गावातील १६०० लाभार्थ्यांना रमाई आवास योजनेंतर्गत घरकुल मिळण्याबाबतचे प्रस्ताव सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात पंचायत समिती, परभणी यांचेकडे सादर केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावावर अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यामुळे रमाई आवास योजनेंतर्गत पात्र असलेल्या लाभार्थ्यांना घरकुलांपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लाभार्थ्यांना तातडीने घरकुल मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१) होय, हे खरे आहे.

परभणी तालुक्यातील १३१ गाव रमाई आवास योजना (ग्रामीण) या योजनेसाठी पात्र असून परभणी तालुक्यासाठी सन २०१७-१८ मध्ये ११०० घरकुलांचे उद्दिष्ट असून त्यानुषंगाने १६०० लाभार्थ्यांनी योजनेचा लाभ मिळण्यासाठी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परभणी यांच्याकडे प्रस्ताव दाखल केले आहेत.

(२), (३) व (४) पंचायत समिती, परभणी कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या १६०० प्रस्तावांपैकी ३२९ लाभार्थ्यांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून उर्वरित अर्जांची छाननी सुरु आहे. छाननी पूर्ण होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

चंद्रपूर जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील आदिवासी घरकूल योजनेंतर्गत ३८८ घरकुलांचे लक्ष्य कमी केल्याबाबत

(११) * ११२७४८ ॲड.संजय धोटे (राजूरा), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील आदिवासी घरकूल योजने अंतर्गत सन २०१७-१८ या वर्षासाठी ३८८ घरकुलांचे लक्ष्य कमी करून १७२ करण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच चंद्रपूर जिल्हयात आदिवासी घरकुल योजने अंतर्गत ७ हजार अर्ज प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले आहे, त्यानुसार चंद्रपूर जिल्हयातील घरकुल योजनेतंर्गत प्रलंबित सर्व आदिवासी अर्जदारांना घरकूले मिळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) होय. शासन पत्र दि. १ जून,२०१७ अन्वये शबरी आदिवासी घरकुल योजनेअंतर्गत घरकुल बांधकामासाठी सन २०१७-१८ या वर्षाकरीता चंद्रपूर जिल्हयाकरीता ३८८ घरकुलांचे उद्दिष्ट आदिवासी लोकसंख्या विचारात घेवून निश्चित ठरविण्यात आले होते. तथापि, लोकसंख्येच्या निकषाऐवजी सामाजिक, आर्थिक व जनगणनेचे निकष लावण्याचे निश्चित केल्याने उद्दिष्ट १७२ झाले. अन्य योजनांतूनही आदिवासी कुटुंबांना घरकुले दिली जातात. सन २०१७-१८ करीता चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी घरकुल योजनेकरीता पात्र प्रधानमंत्री आवास योजना ग्रामिण अतंर्गत अनुसूचित जमातीचे १००३ लाभार्थी, आदीम जमाती घरकुल योजने अंतर्गत २५० लाभार्थींचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहेत.

(२) प्रलंबित अर्ज ७ हजार नसून ५ हजार आहेत. सदर अर्ज सन २००६-०७ ते २०१२-१३ या कालावधीतील असून शबरी आदिवासी घरकुल योजनेच्या निकषात बसणाऱ्या अर्जांची तपासणी करुन आवश्यक ती कार्यवाही प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर यांचे स्तरावर करण्यात येत आहे.

(३) वगळण्याच्या निकषानुसार (Exclusion Criteria) प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधून वगळलेली परंतु ज्या कुटुंबाचे मासिक उत्पन्न रु.१०,०००/- पेक्षा कमी आहे. अशा लाभार्थ्यांना शबरी आदिवासी घरकुल योजनेंतर्गत लाभ देण्यासाठी ३ वर्षांसाठी ५१५ घरकुलांचे सुधारित उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. सन २०१९-२० नंतर एकही आदिवासी घरकुलाविना राहणार नाही असा शासनाचा मानस आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

दादरपाडा (ता.उरण, जि.रायगड) येथील विद्यार्थ्याचा विद्युत वाहिनीचा धक्का लागून झालेला मृत्यू

(१२) * १०९८५५ श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादरपाडा (ता.उरण, जि.रायगड) येथे इयत्ता सहावीत शिकत असलेल्या विद्यार्थ्याचा विद्युत वाहिनीचा धक्का लागून दिनांक २५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, त्यानुसार संबंधित बेजबाबदार वीज कर्मचा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच मृताच्या कुटूंबियास आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे आहे.

(२) सदर अपघाताची चौकशी विद्युत निरीक्षक, रायगड यांनी केली असून या चौकशीमध्ये असे निदर्शनास आले आहे की, दि. २५.१२.२०१७ रोजी कु.निशांत रामकृष्ण मोहिते हा बदामाच्या झाडावर चढून बदाम काढत असताना झाडाची फांदी वाहिनीला घासल्यामुळे सदर फांदी विद्युत भारीत झाली व त्या विद्युत भारीत फांदीच्या संपर्कात सदर मुलगा आल्यामुळे त्याला विद्युत धक्का बसून त्याचा मृत्यू झाला.

(३) चौकशीत सदर अपघातात जबाबदार आढळून आलेल्या महावितरण कंपनीच्या अति. कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., उरण उपविभाग यांना विद्युत निरीक्षक, निरीक्षण विभाग, रायगड या कार्यालयामार्फत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

मयत इसमाच्या कुटुंबियास महावितरण कंपनीकडून रु.४ लाख आर्थिक मदत देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

हिंगोली जिल्ह्यातील मागास क्षेत्र अनुदान योजनेतील गैरव्यवहाराबाबत

(१३) * ११०१६२ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली व नांदेड जिल्ह्यातील सन २००९ ते २०१५ या कालावधीमध्ये मागास क्षेत्र अनुदान योजनेमध्ये एक कोटी ७८ लाख ३२ हजार ७९२ इतक्या रकमेचा गैरव्यवहार झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराची रक्कम दोषी व्यक्तीकडून वसुल करुन त्याच्या विरोधात गुन्हे दाखल करावेत, असे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर गैरव्यवहाराबाबत संबंधित दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय.

मागास क्षेत्र अनुदान योजनेअंतर्गत नांदेड जिल्हयामध्ये गैरव्यवहार झाला नसून हिंगोली जिल्हयात सदर योजनेअंतर्गत रू.७८,३२,७९२/- इतक्या रक्कमेचा गैरव्यवहार झालेला आहे.

(२) होय.

(३) व (४) मागासक्षेत्र अनुदान योजनेअंतर्गत हिंगोली जिल्हयात एकूण ३९ ग्रामपंचायती अंतर्गत अपहाराची एकूण ६० प्रकरणे असून त्यांची अपहारीत रक्कम रू. ७८,३२,७९२/- एवढी आहे. त्यापैकी रू. १७,८०,२९५/- एवढी रक्कम वसुल करण्यात आली आहे. त्यापैकी २१ प्रकरणांमध्ये १६ ग्रामसेवक यांचेकडून १२,७४,६८६/- व १० प्रकरणांत १० सरपंच यांचेकडून रू. ५,०५,६०९/- वसुल करण्यात आले आहेत.

अपहार प्रकरणात एकूण २६ ग्रामसेवक व ३५ सरपंच यांचा समावेश आहे. ३ ग्रामसेवकांवर ११ प्रकरणांत व ३ सरपंच यांचेवर ३ प्रकरणांत पोलीस गुन्हा नोंद केला आहे. ७ सरपंच यांचेवर आर.आर.सी. ची कार्यवाही सुरू आहे. ३ ग्रामसेवक व १ सरपंच मयत झालेले आहेत. २ ग्रामसेवक यांच्या वेतनातून दरमहा वसुली सुरू आहे. २ ग्रामसेवक सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या अंशदानातून वसुलीची प्रक्रिया सुरू आहे. उर्वरित प्रकरणात सरपंच व ग्रामसेवक यांच्यावर गुन्हे दाखल करण्याच्या सूचना जिल्हास्तरावरून गट विकास अधिकारी यांना दिलेल्या आहेत.

धर्माबाद (ता.जि.नांदेड) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचा आहार व दुषित पाणी पुरविण्यात येत असल्याबाबत

(१४) * ११२९५२ श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्माबाद (ता.जि.नांदेड) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतीगृहात विदयार्थ्यांना शिळे अन्न व दुषित पाणी देण्यात आल्याने विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतिगृहातील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचा आहार व दूषित पाणी मिळत असून वारंवार तेथील वसतीगृहातील मुलांच्या प्रकृतीत बिघाड होत असल्याने निकृष्ट दर्जाचा आहार पुरविणाऱ्या ठेकेदारांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच वसतीगृहातील विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचा आहार व पाणी पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१) धर्माबाद, जिल्हा नांदेड येथील शासकीय वसतीगृहातील १४ विद्यार्थ्यांनी दि.०६/०१/२०१८ रोजी नाष्टा केल्यानंतर त्यांना उलट्या व पोटदुखीचा त्रास झाल्याची तक्रार केलेली आहे.
(२) भोजन पुरवठादारास निकृष्ट भोजन पुरवठ्यासंदर्भात दंड आकारण्यात आला असून, पुरवठादारास काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.
(३) सदर पुरवठाधारक संस्थेचा भोजन पुरवठा बंद करून पर्यायी भोजन व्यवस्था करण्यात आलेली असून पिण्याच्या शुध्द पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे. तसेच नवीन भोजन ठेक्यासंदर्भात ई-निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्ह्यात घरकुल योजनांसाठी गायरान अथवा शासकीय जागेत घरकुले बांधण्यास परवानगी देण्याबाबत

(१५) * ११३२०० श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील अनुसूचित जाती व नवबौध्द कुटूंबांना रमाई आवास योजनेतंतर्गत घरकुलाकरिता अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेअंतर्गत जिल्हा विकास यंत्रणेकडून पुणे जिल्ह्यात सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात २४०९ घरांच्या उद्दिष्टांपैकी ६७६ घरकुलांचे बांधकाम पुर्ण करण्यात आले आहेत, तसेच उर्वरित लाभार्थ्यांना स्वतःची जागा नसल्याने घरकुले बांधता येत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या घरकुल योजनांसाठी गायरान अथवा शासकिय जागेतील ग्रामीण भागात ३ मजली घरकुले बांधकाम करण्यास परवानगी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१) होय.

रु.१.०० लक्षच्या आत वार्षिक उत्पन्न असलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ च्या प्राधान्यक्रम यादीच्या बाहेरील बेघर कुटुंबांना ग्रामीण भागात २६९ चौ.फुट क्षेत्रफळाचे घर रमाई आवास योजनेंतर्गत देण्यात येते.
(२) नाही. हे खरे नाही.

रमाई आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत सन २०१६-१७ या वर्षात पुणे जिल्हयासाठी २४०९ इतके घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. या उद्दिष्टांपैकी दि.१६/२/२०१८ अखेर ९२६ घरकुलांची कामे प्रगतीपथावर आहेत. घरकुल मंजूर केलेल्या सर्व लाभार्थ्यांकडे घरकुल बांधकामासाठी स्वत:ची जागा उपलब्ध आहे. जागा नसलेल्या लाभार्थ्यांची संख्या निरंक आहे.

तसेच सन २०१७-१८ या वर्षात पुणे जिल्हयाकरीता निश्चित करण्यात आलेल्या १९३० उद्दिष्टांपैकी दिनांक १६/२/२०१८ अखेर १६८७ लाभार्थ्यांच्या घरकुलास मंजूरी देण्यात आली आहे.
(३) ज्या पात्र लाभार्थ्यांना घरकुलाच्या बांधकामासाठी स्वत:ची जागा उपलब्ध नाही अशा लाभार्थ्यांना ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र.प्रआयो-२०१७/प्र.क्र.६०/योजना-१०, दि.१४/७/२०१७ अन्वये पंडित दिनदयाल उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत जागा खरेदीस रु.५०,०००/- इतके अर्थसहाय्य देण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बँकांकडून कर्जपुरवठा होत नसल्याबाबत

(१६) * ११२२०७ श्री.बबनराव शिंदे (माढा) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बँकांकडून कर्जपुरवठा होत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रब्बी हंगामामध्ये शेतकऱ्यांना वार्षिक पतपुरवठा आराखड्यात २३८९ कोटी रूपयांचे कर्ज वाटपाचे उद्दिष्ट देण्यात येऊनही केवळ ३६३ कोटी रूपयांचे कर्जवाटप करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाने बँक सेवा लोकशाही दिन आयोजित करून बँकांना सुचना देऊनही पिक कर्ज, मुद्रा योजना आदींसाठी कर्जपुरवठा करणेसाठी बँकाकडून उदासिनता दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शेतकरी तसेच कर्ज मागणी केलेल्या अन्य घटकांना वेळेत कर्जपुरवठा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१) अंशत: खरे आहे.

(२) राष्ट्रीयकृत / खाजगी व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना रब्बी हंगामासाठी रु.२३८९.४८ कोटी कर्ज वाटपाचे उद्दिष्ट दिलेले आहे. त्यापैकी सदर बँकांनी दिनांक १२/२/२०१८ अखेर रु.७५९.६३ कोटी कर्ज वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण केलेले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

सांगली जिल्ह्यातील टेंभू सिंचन योजना सौर उर्जेवर सुरु करण्याच्या प्रस्तावाबाबत

(१७) * १०८४३३ श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) : सन्माननीय **नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील टेंभू सिंचन योजना सौर उर्जेवर कार्यान्वित करण्यासाठी ६० मेगावॅटच्या प्रकल्पाचा प्रस्ताव महानिर्मितीने शासनाकडे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, असल्यास, त्याचे स्वरूप काय आहे, तसेच, त्यासाठी अंदाजे किती खर्च येणार आहे व उक्त काम कधीपर्यंत सुरु होणे अपेक्षित आहे,

(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे अंशत: खरे आहे.

टेंभू उपसा सिंचन योजना, जि.सांगली येथे जलसंपदा विभागाच्या जमिनीवर ६० मे.वॅ. क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल महानिर्मिती कंपनीने शासनाच्या जलसंपदा विभागास दि. ६/७/२०१७ च्या पत्रान्वये सादर केला आहे.

(२) व (३) या प्रस्तावाबाबत शासन स्तरावर जलसंपदा विभागाकडून कार्यवाही सुरू आहे. जलसंपदा विभागाने सदर प्रस्तावाबाबत महानिर्मिती कंपनीला त्यांचे दि.१९/७/२०१७ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार प्रस्तावाचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे :-

अ) महानिर्मिती कंपनीही या प्रकरणी प्रकल्प अंमलबजावणी संस्था (PIA) म्हणून काम करेल.

ब) प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी अटी व शर्ती महानिर्मिती व जलसंपदा विभाग यांचेमध्ये होणाऱ्या सामंजस्य करारावेळी निश्चित केल्या जातील.

क) प्रकल्पासाठीच्या मूलभूत सुविधावरील खर्च जलसंपदा विभाग करणार असून संपूर्ण प्रकल्पाचा खर्च विकासक करणार आहे.

कोल्हापूर जिल्हयातील शेतीसाठी दिवसा १० तास वीजपुरवठा सुरु करण्याबाबत

(१८) * १०७२२९ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील चंदगड, गडहिंग्लज व आजरा हे तालुके डोंगराळ व दुर्गम असल्याने या ठिकाणी जंगली जनावरे तसेच रानटी हत्ती इत्यादी वन्य श्वापदांचा उपद्रव होत असल्याने शेतीकरीता रात्री ऐवजी दिवसा १० तास वीजपुरवठा सुरु करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.उर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक ९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, असल्यास, त्यानुसार शेतीसाठी दिवसा वीजपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे आहे.

(२) पाण्याचे योग्य नियोजन करण्यासाठी व कृषी पंपासाठी आवश्यक असलेला विद्युत पुरवठा लक्षात घेऊन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्यातील कृषी वाहिन्यांवरील कृषी ग्राहकांना दिवसा ८ तास किंवा रात्रीच्या काळात १० तास थ्री फेज वीजेची उपलब्धता चक्राकार पध्दतीने देण्यात येत आहे. तसेच विभागनिहाय कृषी वाहिन्यांवरील कृषी ग्राहकांच्या वेळापत्रकामध्ये प्रत्येक महिन्यास बदल करण्यात येत आहे.

त्याप्रमाणे कोल्हापूर जिल्हयातील चंदगड, गडहिंग्लज व आजरा येथे दिवसा ८ तास किंवा रात्री १० तास चक्राकार पध्दतीने कृषी वीज वाहिन्यांना वीज पुरवठा करणे सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे सांगवी (ता.पाथर्डी, जि.अहमदनगर) येथे विना परवाना व बेकायदेशीरपणे मद्यार्काची (स्पिरीट) वाहतूक करणारा टँकर पकडल्याबाबत

(१९) * ११०८६४ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सांगवी (ता.पाथर्डी, जि.अहमदनगर) येथे विना परवाना व बेकायदेशीर २० हजार लिटर मद्यार्काची (स्पिरीट) वाहतूक करणारा एमएच ०४ डीएस ९८०८ या क्रमांकाचा टँकर दिनांक ६ सप्टेंबर, २०१६ रोजी राज्य उत्पादन शुल्क विभागाने पकडला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, में. गंगाखेड शुगर एण्ड एनर्जी लि.विजयनगर माखणी (ता.गंगाखेड जि.परभणी) या कंपनीचे व्यवस्थापक बाळासाहेब लोहार यांनी विनापरवानगीने व बेकायदेशीरपणे २० हजार लिटर मद्यार्काची (स्पिरीट) अवैधरित्या विक्री करण्यासाठी टँकर पाठविला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाच्या चौकशी दरम्यान आसवणी अंतर्गत मळीचा वापर करणेकरिता नमुना एम-२ अनुज्ञप्ती अंतर्गत प्रत्यक्ष मळी साठा नोंदवहीत नमुद साठयापेक्षा १०७१.८५४ मे.टन मळी अनधिकृतरित्या अतिरिक्त आढळून आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१), (२) व (३) होय.

(४) या प्रकरणी संबंधितांविरूध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ अन्वये गु.र. क्र. ३३३/२०१६, दि. ६.९.२०१६ रोजी नोंदविलेला असून त्यामध्ये एकुण ५ आरोपींना अटक करण्यात आली. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई यांनी

त्यांच्या दि.२१ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या आदेशान्वये घटकाची फॉर्म आय अनुज्ञप्ती रद्द केली होती. घटकाने केलेल्या विनंतीनुसार, शासन आदेश, दि.१८ सप्टेंबर, २०१७ अन्वये, सदर अनुज्ञप्ती रद्द करण्याऐवजी घटकास रु.५.०० लक्ष दंड आकारण्यात आला असून सदर प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याच्या अनुषंगाने फौजदारी कारवाई पुढे चालू ठेवण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

लातूर येथील वसतिगृहातील विद्यार्थ्यांना विविध साहित्यासाठीचे अनुदान मिळाले नसल्याबाबत

(२०) * ११३६६२ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मागील २ वर्षांपासून ड्रेसकोड, स्टेशनरी आणि सहलीसाठी दिले जाणारे अनुदान मिळाले नसल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर येथील १ हजार क्षमतेच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष संपत आले तरीही अनुदान मिळत नसल्याने गुणवत्तेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त करत या अनुदान मागणीसाठी दिनांक १ मार्च, २०१८ रोजी निदर्शने करण्याचे लेखी निवेदन दिनांक ३१ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी, लातूर यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. राजकुमार बडोले : (१) सन २०१६-१७ मधील एकूण २६५० प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी १८५० विद्यार्थ्यांना शालेय साहित्यापोटी अनुज्ञेय रक्कम अदा करण्यात आली असून, सन २०१७-१८ मधील २६९९ प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी ४७१ विद्यार्थ्यांना शालेय साहित्यापोटी अनुज्ञेय रक्कमेचे वाटप करण्यात आलेले आहे.
(२) होय.
(३) यासाठी आवश्यक तरतूद उपलब्ध करून विद्यार्थ्यांना शालेय साहित्यापोटी अनुज्ञेय रक्कम अदा करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील सहकारी खरेदी-विक्री संस्थेमध्ये झालेला गैरव्यवहार

(२१) * १०६९१३ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील सहकारी खरेदी-विक्री संस्थेमध्ये जिल्हा मार्केटिंग अधिकारी, बुलढाणा यांनी बँकेतून परस्पर पैसे काढून गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१) नाही.

तथापि, तालुका सहकारी खरेदी विक्री संस्था, सिंदखेडराजा या संस्थेच्या ०७ संचालकांनी व ०५ कर्मचाऱ्यांनी अनुक्रमे ऑनलाईन खरेदीच्या कामकाजाबाबत व संस्थेच्या खात्यामधुन रक्कम काढून भ्रष्टाचार केल्याची तक्रार केली आहे.

(२) उपरोक्त दोन्ही निवेदनाच्या अनुषंगाने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, देऊळगांव राजा व सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सिंदखेडराजा आणि तालुका उपलेखापरिक्षक सहकारी संस्था, सिंदखेडराजा यांची संयुक्त चौकशी समिती नियुक्त करण्यात आली असून चौकशी सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आदिवासी वसतिगृहे भाडयाच्या इमारतीत कार्यरत असल्याबाबत

(२२) * १०७१७७ श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ७० टक्के आदिवासी वसतिगृहे भाडयाच्या इमारतीत कार्यरत असून वर्षाला भाड्याकरिता सुमारे ३० कोटींचा खर्च शासनाला करावा लागत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार आदिवासी वसतिगृहांना स्वत: च्या इमारती बांधून देणेसाठी निधीची उपलब्धता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) राज्यात अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, ठाणे, नागपूर व अमरावती यांच्या कार्यक्षेत्रातील २९ प्रकल्प कार्यालयाच्या अधिनस्त एकूण ४९० वसतिगृहे कार्यरत असून त्यापैकी ३१३ वसतिगृहे हे भाडयाच्या इमारतीत कार्यरत असून १७७ वसतिगृहे शासकीय इमारतीत कार्यरत आहेत. सदर भाडयाच्या इमारतीत कार्यरत असलेल्या इमारतीच्या भाडयापोटी रुपये २३.७२ कोटी इतका वार्षिक खर्च आहे.

(२) व (३) सन २०१७-१८ या वर्षात अर्थसंकल्प भाग-३ परिशिष्ट 'ड' मध्ये शासकीय वसतिगृहांसाठी ७१ इमारत बांधकामाचा समावेश असून त्यासाठी रु. २८७४.०७ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

आदिवासी विकास विभागामार्फत वसतिगृहाच्या बांधकामाचा नवीन टाईप प्लॅन मंजूर करण्यात आलेला असून त्याप्रमाणे शासकीय जागा उपलब्ध असलेल्या वसतिगृहाच्या बांधकामाच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याची कार्यवाही सुरु आहे. भाडयाच्या इमारतीत असलेले वसतिगृहांच्या इमारतीसाठी शासकीय जागा उपलब्ध करुन घेण्याची किंवा ज्या ठिकाणी शासकीय जागा उपलब्ध होऊ शकणार नाही त्या ठिकाणी जाहिरातीद्वारा खाजगी जागा उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

चिंच कुंभ, परसोडा, बेलमंडळी (ता.चांदूर बाजार, जि.अमरावती) या गावांना जोडणाऱ्या पुलाच्या बांधकामाकरिता निधी उपलब्ध करणेबाबत

(२३) * १०६३२६ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंच कुंभ, परसोडा, बेलमंडळी (ता.चांदूर बाजार, जि.अमरावती) या गावांना जोडणाऱ्या पुलाचे बांधकाम करण्याकरिता अंदाजे १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी मा.आदिवासी विकास मंत्री यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने शासनाने निधी उपलब्ध करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) होय.
(२) व (३) अमरावती जिल्हयातील चिंच कुंभ, परसोडा, बेलमंडळी ता.चांदूरबाजार ही गावे आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील असल्याने प्रस्तावित पुलाच्या कामास आदिवासी उपयोजनेतून निधी उपलब्ध करुन देणे प्रचलित धोरणात बसत नाही.

तुमसर (जि.भंडारा) नगर परिषद येथे रमाई आवास योजनेंतर्गत झालेला गैरव्यवहार

(२४) * **१०९१८६ श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तुमसर (जि.भंडारा) नगर परिषद येथे रमाई आवास योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकासाठी घरकुल योजनेच्या अंमलबजावणीत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २८ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१) होय. हे खरे आहे.
(२) व (३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने सहायक आयुक्त, समाजकल्याण, भंडारा यांच्या स्तरावर चौकशी समिती गठीत केली आहे. सदर समितीचा चौकशी अहवाल प्राप्त होताच पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

आदिवासीबहुल भागातील जमिनी बिगर आदिवासींकडे हस्तांतरीत करताना ग्रामसभेची परवानगी घेणे बंधनकारक करण्याबाबत

(२५) * १११४०४ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने माहे जून, २०१६ मध्ये अधिसूचना काढून आदिवासीबहुल भागातील जमिनी अवैध मार्गाने बिगर आदिवासींकडे हस्तांतरीत होऊ नयेत म्हणून जमिनीच्या व्यवहारात ग्रामसभेची परवानगी घेणे बंधनकारक केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अधिसूचनेत दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी शासनाने बदल करुन नवीन अधिसूचना काढून अनुसूचित क्षेत्रातील आदिवासींच्या जमिनी केंद्र किंवा राज्य शासनाच्या विकास योजनांसाठी आवश्यक असल्यास आणि अशा जमिनी परस्पर करारातून योग्य मोबदला देऊन विक्री होत असल्यास ग्रामसभेच्या पूर्व परवानगीची गरज नसल्याचे जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही अधिसूचना आदिवासी स्वयंशासन कायद्याच्या विरुद्ध असून ती त्वरीत रद्द करुन अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेला संवैधानिक अधिकार परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१), (२) व (३) भारतीय राज्यघटनेच्या पाचव्या अनुसूचीमधील परिच्छेद क्र.५(१) मधील प्राप्त अधिकारानुसार मा. राज्यपाल महोदय यांनी दि.१४.६.२०१६ रोजी 'महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६' मधील कलम ३६-अ ची तरतूद राज्यातील अनुसूचित क्षेत्रात सुधारणेसह लागू करण्याबाबत अधिसूचना काढली, या अधिसूचनेनुसार "राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील गावांमध्ये ग्रामसभेची मंजूरी मिळाल्याशिवाय आदिवासी व्यक्तींच्या जमिनीचा भोगवटा बिगर आदिवासी व्यक्तीकडे हस्तांतरित करण्यास जिल्हाधिकारी यांनी मंजूरी देऊ नये." अशा आशयाची तरतूद करण्यात आली आहे.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादीत, यांनी नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्ग हा राज्यशासनाचा महत्वाकांक्षी प्रकल्प असल्याने या व अन्य महत्वाकांक्षी सार्वजनिक प्रकल्पांना जमीन संपादनाच्या प्रक्रीयेत गतिमानता व सुलभता यावी, या उद्देशाने अशा प्रकल्पांसाठी आदिवासी व्यक्तींची अनुसूचित क्षेत्रातील जमीन संपादित करणे आवश्यक असल्यास उक्त तरतूदीतील "ग्रामसभेच्या मंजूरीचा ठराव" अनिवार्य असल्याची अट अशा प्रकल्पांकरीता शिथील करण्याची विनंती केलेली होती. त्यानुसार मा. राज्यपाल यांच्या कार्यालयास अनुसूचित क्षेत्रातील गावांमध्ये आदिवासी व्यक्तींच्या जमीनीचे संपादन शासनाच्या महत्वाकांक्षी प्रकल्पाकरीता करण्यात येत असताना ग्रामसभेचा मंजूरी विषयक "ठराव" अनिवार्य असल्याची अट शिथील करण्याची विनंती शासनाकडून करण्यात आली. त्यानुसार मा. राज्यपाल महोदय यांनी भारतीय राज्यघटनेच्या पाचव्या अनुसूचीमधील परिच्छेद क्र.५(१) मधील प्राप्त अधिकारानुसार दि. १४.११.२०१७ रोजीची वर नमूद केल्याप्रमाणे अट शिथील करण्याची अधिसूचना काढलेली आहे. सदर अधिसूचना राज्याच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात दलितवस्ती सुधार योजनेंतर्गत मंजूर कामामध्ये झालेला गैरव्यवहार

(२६) * १११५५१ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विजय औटी (पारनेर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दलितवस्ती सुधार योजनेअंतर्गत विकास कामांमध्ये सन २०१० ते २०१५ या पाच वर्षात ८० ग्रामपंचायतीमध्ये मंजूर रुपये ६७२ कोटीपैकी सुमारे ३२४.८६ कोटी रुपयांच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याची बाब कॅगने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आणून दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रकरणातील संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१) हे खरे नाही, अशी बाब या विभागामध्ये निदर्शनास आलेली नाही.
(२) ते (४) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ जिनिंग ॲण्ड प्रेसिंग फॅक्टरी या संस्थेवर असलेले कर्ज वसुल करण्याकरिता राबविलेल्या निविदा प्रक्रियेसंदर्भात चौकशी करण्याबाबत

(२७) * १०८७९८ श्री.अमर काळे (आर्वी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने धामणगाव रोडवर असलेल्या यवतमाळ जिनिंग ॲण्ड प्रेसिंग फॅक्टरी मर्या. या संस्थेवर असलेले ६ कोटी ८४ लाख रुपयांचे कर्ज वसुल करण्याकरीता राबविलेली निविदा प्रक्रिया व पार पाडलेली खरेदी-विक्री या सर्व बाबी संशयास्पद असल्याने पणन संचालक, पुणे यांनी सर्व निविदा व खरेदी विक्री प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिल्याची बाब दिनांक २० नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी सहाय्यक निबंधकाच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय चौकशी समिती नेमण्यात येऊन सिक्यूरिटायझेशन ॲक्ट मधील कलम ९ नुसार निर्धारित रकमेपेक्षा (ऑफसेट व्हॅल्यू) कमी किंमतीत संपत्ती विकता येत नसल्याचा शासकीय नियम असतानाही यवतमाळ सहकारी जिनिंग ॲण्ड प्रेसिंग यांची ८ एकर जमीन व मशिनरी इत्यादीची शासनाचे नियमानुसार होत असणारे बाजारमूल्य निश्चित न करता निविदा काढून खरेदी विक्री केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समितीने तपास केला आहे काय, त्यानुसार अहवालात नमूद केलेल्या प्रमुख बाबी कोणत्या आहेत, त्यानुसार दोषी आढळून आलेल्या व्यक्तींविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) तपास समितीने सादर केलेल्या अहवालानुसार बँकेने संस्थेच्या स्थावर व जंगम मालमत्तेची जी राखीव किंमत (रिझर्व्ह प्राईज) निश्चित केली आहे, त्यापेक्षा आलेल्या निविदा कमी दराच्या आहेत. अशा परिस्थितीत निविदा रद्द करून पुन्हा मालमत्तेची निविदा काढावी, अशा सूचना संबंधित संस्थेने यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस दिल्या होत्या. तसेच सहाय्यक निबंधक, यवतमाळ यांनी संस्थेला सदर व्यवहार मान्य नसल्यास सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागण्याबाबत संस्थेस दिनांक २०/१२/२०१७ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७९(१) अन्वये निर्देश दिले आहेत. तसेच संस्थेने दिनांक १३/२/२०१८ रोजी सदर व्यवहार मान्य नसल्याबाबत बँकेस कळविले आहे. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी सदर प्रकरणी सरफेशी कायदा, २००२ च्या कायद्यातील तरतुदींचे पालन करण्याबाबत बँकेस सूचना दिल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

हिंगोली जिल्ह्यातील शुभमंगल अर्बन को.ऑप.सोसायटी या बँकेने नागरिकांच्या ठेवी परत न करता राज्यातील सर्व शाखा बंद केल्याबाबत

(२८) * ११२५८९ श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यातील शुभमंगल अर्बन को.ऑप.सोसायटी या बँकेच्या शाखेमध्ये अनेक लोकांनी ठेवी ठेवल्या असून सदर बँकेने त्यांच्या खात्यातील

पैसे परत न करता, जिल्ह्यासह राज्यातील शाखा बंद केल्यामुळे नागरिकांचे आर्थिक नुकसान झाल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी नागरिकांनी शाखेच्या कार्यालयाची तोडफोड केली आहे व बँकेच्या कर्मचाऱ्यांना मारहाण करुनही नागरिकांना त्यांच्या ठेवी परत करण्यात आलेल्या नाहीत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, सदर बँकेतील खातेदारांना त्यांच्या ठेवी परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१) हे खरे नाही.

शुभमंगल अर्बन को-ऑप. सोसायटी नावाची कोणतीही सहकारी पतसंस्था अथवा बँकेची राज्यात नोंदणी झालेली नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आश्रमशाळांसाठी असलेल्या परिरक्षण अनुदानात वाढ करण्याच्या मागणीबाबत

(२९) * १०९११४ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आश्रमशाळांसाठी परिरक्षण अनुदान सध्या प्रती विद्यार्थी प्रती महिना रु.९०० रुपये असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ९०० रुपये अनुदानामधून दोन वेळ जेवण, नाश्ता देणेसाठी सदरील रक्कम अपूरी पडत असल्याने विद्यार्थ्यांना पुरेसा आहार मिळत नसल्याने सदरील अनुदानात वाढ करण्याची मागणी आश्रमशाळेच्या व्यवस्थापनाकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच उक्त प्रकरणी किमान रु.१५००/- प्रति महिना प्रति विद्यार्थी वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणा-या अनुदानित आश्रमशाळांना देण्यात येणारे परिरक्षण अनुदान शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग दिनांक २९.१२.२०११ अन्वये रु.९०० प्रतिविद्यार्थी प्रतिमहिना करण्यात आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) परिपोषण अनुदान हे सामाजिक न्याय विभाग, विमुक्त जाती भटक्या जमाती विभाग, महिला व बाल विकास विभाग व आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या सर्व आश्रमशाळा व वसतीगृहांसाठी एकत्रितपणे निश्चित करण्यात येते. सदर परिपोषण अनुदानात वाढ करण्यासाठी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट स्थापन करण्यात आला आहे. अभ्यासगटाच्या शिफारशीनुसार परिरक्षण अनुदानात वाढ करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

लातूर जिल्ह्यातील शेतीपंपाची जळालेली वा नादुरुस्त असलेली रोहित्रे बदलून दिली जात नसल्याबाबत

(३०) * १११११३१ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा, लातूर व रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील जळालेली वा नादुरुस्त असलेली शेतीपंपाची व सिंगल फेज रोहित्रे वेळेत बदलून दिली जात नसून ऑईलचा पुरवठा वेळेत होत नसल्यामुळे ती बदलली जात नसल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कालवा व तलावातील पाण्याचा वापर केला नसतानाही देण्यात आलेली चुकीची व वाढीव बिले दुरुस्त करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी अधीक्षक अभियंता, लातूर यांच्याकडे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये निवेदनाद्वारे मागणी केल्यानुसार बिले दुरुस्त करुन देण्याबाबत लातूर येथे दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी झालेल्या आढावा बैठकीत मा.ऊर्जा मंत्री यांनी अधीक्षक अभियंता लातूर यांना आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांच्या शेतीपंपाची व रोहित्रांची मंजूर व कार्यारंभ आदेश दिलेली कामे अद्यापही अपूर्णावस्थेत असून सदर कामे तातडीने वेळेत पूर्ण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०१५ ते आजतागायत लातूर जिल्ह्यातील तालुकानिहाय किती शेतीपंपाची रोहित्रे नादुरुस्त वा जळाली असून ते दुरुस्त करून खंडित विद्युत पुरवठा पूर्ववत सुरु करण्याबाबत सरासरी किती कालावधी लागलेला आहे, तसेच नादुरुस्त रोहित्रांकरिता ऑईल पुरवठा मागणी विभागनिहाय किती होती व किती पुरवठा करण्यात आलेला आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार लातूर जिल्ह्यातील किती शेतकऱ्यांना जास्तीची व चुकीची वीजबिले देण्यात आली आहेत व त्यापैकी किती शेतकऱ्यांची वीज बिले दुरुस्त करून देण्यात आली

आहेत, तसेच, नादुरुस्त रोहीत्रे वेळेवर दुरुस्त करुन देण्यास विलंब लावणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली व अपूर्ण असलेली शेतीपंप व रोहित्रांची कामे वेळेत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) लातूर जिल्ह्यात सन २०१५ ते आजतागायत एकूण ४५७९ रोहित्रे नादुरुस्त झालेली आहेत. सदर नादुरुस्त रोहित्रे दुरुस्त करण्यासाठी सरासरी १० दिवसांचा कालावधी लागलेला आहे. नादुरुस्त रोहित्रांकरिता मागणी केल्याप्रमाणे सन २०१५-१६ ते जानेवारी, २०१८ पर्यंत लातूर विभागास १००.१७ कि.लि. निलंगा विभागास २६३.१३ कि.लि. व उदगीर विभागास १६१.७६ कि.लि., ऑईलचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

(५) महावितरण कंपनीमार्फत याबाबत चौकशी करण्यात आली आहे. लातूर मंडळातील कृषीपंप ग्राहकांच्या वीज देयकाच्या दुरुस्तीबाबत जानेवारी, २०१८ मध्ये शाखा कार्यालय निहाय शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. त्यात प्राप्त झालेल्या ६२८ तक्रारींपैकी ४९५ शेतकऱ्यांची वीज देयके दुरुस्त करण्यात आलेली असून उर्वरित देयकांच्या दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे. सन २०१५ ते आजतागायत लातूर मंडळातील एकूण नादुरुस्त ४५७९ रोहित्रांपैकी ४४९५ रोहित्रे बदलण्यात आलेली आहेत. उर्वरित ८४ नादुरुस्त रोहित्रे बदलण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच सन २०१५-१६ ते जानेवारी, २०१८ पर्यंत लातूर जिल्हयांत एकूण ८,२७२ शेतीपंपास वीजजोडण्या देण्यात आल्या आहेत. पैसे भरुन वीजजोडणी करिता प्रलंबित उर्वरित कृषीपंप जोडणीची कामे प्रगतीपथावर आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

भोर (जि.पुणे) येथील राजगड ज्ञानपीठ या संस्थेमधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती न मिळाल्याबाबत

(३१) * ११२१३५ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) येथील राजगड ज्ञानपीठ या संस्थेच्या विविध महाविदयालयांतील शिष्यवृत्तीची सन २०१३-१४ ते सन २०१६-१७ अखेरपर्यंत रु.२,४५,००,५२८/- इतकी रक्कम येणे बाकी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रकमेमुळे उक्त महाविदयालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदयाप न मिळाल्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होणार असून संस्था चालविणे देखील अडचणीचे व गैरसोईचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरील शिष्यवृत्तीची थकीत रक्कम तातडीने अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१) हे खरे नाही.

(२) व (३) सन २०१३-१४ ते २०१६-१७ या कालावधीतील राजगड ज्ञानपीठ या संस्थेने शिष्यवृत्ती व फ्रीशीपसाठी ऑनलाईन भरलेल्या अर्जानुसार रु.८४०.२४ लक्ष इतक्या रकमेच्या मागणीपैकी रु.८०९.१३ लक्ष इतक्या रकमेची देयके ऑनलाईन जनरेट करुन संबंधित संस्थेअंतर्गत संबंधित महाविद्यालयाच्या बँक खात्यावर ईसीएसद्वारे पाठविण्यात आली आहे.

उर्वरित एकूण रु.३१.११ लक्ष इतक्या रकमेपैकी रु.२८.३६ लक्ष रकमेचे प्रस्ताव संबंधित महाविद्यालयाने विलंबाने म्हणजेच ऑनलाईन संकेतस्थळ बंद झाल्यानंतर सादर केले असल्याने, ऑनलाईन संकेतस्थळ पुन्हा कार्यान्वित करुन प्रलंबित रक्कम अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच महाविद्यालयाकडे प्रलंबित असलेले रु.२.७५ लक्ष इतक्या रकमेचे परिपूर्ण प्रस्ताव संबंधित महाविद्यालयाकडून प्राप्त करुन त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

चाकण (ता.खेड, जि.पुणे) येथील राजगुरूनगर सहकारी बँकेच्या म्हाळुंगे इंगळे शाखेतील रोखपालाने केलेला गैरव्यवहार

(३२) * १०५८८३ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण (ता.खेड, जि.पुणे) येथील राजगुरूनगर सहकारी बँकेच्या म्हाळुंगे इंगळे शाखेतील रोखपालाने बँकेच्या व खातेदारांच्या ८१ लाख ३४ हजार इतक्या रकमेचा गैरव्यवहार केला असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाखेतील रोखपालाने नोकरी करताना दैनंदिन कामकाजात ग्राहक सेवेसाठी स्ट्राँग रुममधून पैसे काढणे, एटीएममध्ये पैसे भरणे, त्याचा तपशील ठेवणे व दिवस अखेरीस शिल्लक रक्कम स्ट्राँग रूममध्ये जमा करणे अशा प्रकारचे काम करताना उपरोक्त रकमेचा गैरव्यवहार केला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) राजगुरूनगर सहकारी बँकेच्या म्हाळुंगे इंगळे या शाखेची बँकेच्या अधिकाऱ्यांमार्फत करण्यात आलेल्या तपासणी दरम्यान संबंधीत शाखेच्या रोखपालाने रु. ८१,४१,३४३/- इतक्या रोख रक्कमेचा अपहार केल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार, बँकेने म्हाळुंगे इंगळे शाखेच्या रोखपालाविरुद्ध चाकण पोलिस स्टेशन येथे दिनांक ८.१.२०१८ रोजी गुन्हा र.न. ३४/१८ दाखल केला आहे. बँकेने संबंधीत रोखपालास दिनांक ८.१.२०१८ रोजी बँकेच्या सेवेतून निलंबीत केले असून म्हाळुंगे इंगळे शाखेचे व्यवस्थापक व सहव्यवस्थापक या दोघांनादेखील दिनांक ९.१.२०१८ रोजी बँकेच्या सेवेतून निलंबीत केलेले आहे.

प्रस्तूत प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करणेबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण यांनी त्यांच्या दिनांक ५.२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, खेड यांना कळविले आहे.

नांदेड जिल्ह्यातील मागासवर्गीय वसतिगृहात गृहपालाची रिक्त पदे भरुन विद्यार्थ्यांना सुविधा पुरविण्याबाबत

(३३) * ११३४८७ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील ७ मागासवर्गीय वसतिगृहात महिला गृहपालांची पदे रिक्त असून उक्त वसतीगृहात निकृष्ट भोजन, अस्वच्छता या समस्या असून विद्यार्थीनीच्या सुरक्षेबाबत कोणतीही काळजी घेतली जात नसल्याबद्दलची तक्रार समाजकल्याण आयुक्त यांच्याकडे करुनही त्यांनी दुर्लक्ष केल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतिगृहात असलेल्या असुविधांमुळे हदगाव (जि.नांदेड) येथील एका विद्यार्थीनीने आत्महत्या केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रिक्त असलेली गृहपालाची पदे भरणेबाबत व विद्यार्थीनींना सुविधा पुरविण्यास दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१) नांदेड जिल्ह्यात मुलींची एकूण ७ वसतिगृहे मंजूर आहेत. त्यापैकी २ वसतिगृहांमध्ये नियमित महिला गृहपाल कार्यरत असून ५ वसतिगृहांतील गृहपाल पदे रिक्त आहेत. गृहपालांच्या रिक्त पदांचा

अतिरिक्त कार्यभार इतर महिला गृहपाल अथवा कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांकडे सोपविण्यात आलेला आहे.

वसतिगृहातील प्रवेशित मुलींना सर्व सोयीसुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत. तसेच वसतिगृहातील स्वच्छता व विद्यार्थीनींच्या सुरक्षेकरिता आवश्यक कर्मचारी पुरविण्यात आलेले आहेत.

(२) मुलींचे शासकीय वसतिगृह, हदगांव येथील प्रवेशित एका विद्यार्थीनीने वसतिगृहातील निवासी खोलीत आत्महत्या केली हे खरे आहे. परंतू तिने वसतिगृहातील असुविधांमुळे आत्महत्या केली, हे खरे नाही.

(३) प्रस्तुत प्रकरणी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, नांदेड यांचे स्तरावर चौकशी समिती गठीत करून प्राप्त चौकशी अहवालानुसार संबंधित गृहपालांवर कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) विलंब झालेला नाही.

राज्यातील वीजदर इतर सर्व राज्यांच्या तुलनेत जास्त असताना पुन्हा वीजदर वाढीचा प्रस्ताव दाखल केल्याबाबत

(३४) * ११०८५८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अजय चौधरी (शिवडी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वीजदर हे इंधन समायोजन आकारासह इतर सर्व राज्यांच्या तुलनेत किमान ३५ ते ५० टक्क्यांनी जास्त असून ३०० युनिट वीजग्राहकांचे दर दीडपट ते दुप्पट आहेत तर व्यापारी वीजग्राहकांचे दर दुप्पट ते अडीचपट असून शेतकरी वीजग्राहकांचे वीज दर देशात तिसऱ्या क्रमांकावर असतांना पुन्हा महावितरण कंपनीने सरासरी १९ ते २७ टक्के वीजदर वाढीचा प्रस्ताव दाखल केला असल्याने राज्यात युनिटमागे एक रुपया ३७ पैशांची वाढ होणार असल्याचे दिनांक ०८ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानिर्मिती कंपनीचा वीज उत्पादन व प्रशासकीय खर्च, होत असलेली वीज गळती याचा संपुर्ण आर्थिक भार वीज ग्राहकांवर टाकण्यात येऊन वीज ग्राहकांची फसवणूक करण्यात येत असताना वीज नियामक आयोगाने सन २०१५-१६ ते २०१९-२० या पाच वर्षांसाठी महावितरणला वीज दरवाढीस मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वीज दरवाढीमुळे ग्राहकांवर किती कोटी रुपयांचा आर्थिक भार पडणार आहे,

(४) तसेच वीज दरवाढ नियंत्रणात आणण्यासाठी वीजग्राहक व औद्योगीक संघटना समन्वय समितीने शासनास दिनांक ७ जुलै, २०१७ रोजी निवेदन दिले असून या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(५) त्यानुसार सदरहू प्रस्तावित दरवाढ रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच महानिर्मिती कंपनीचा प्रशासकीय कारभार सुधारुन होणारी वीज गळती थांबविण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे नाही.

महावितरण कंपनीचे वीजदर हे इतर राज्यातील वीजदराच्या तुलनेत जवळपास सारखे आहेत. महावितरण कंपनीने मध्यावधी पुर्नविचार याचिका दिनांक २१.१२.२०१७ रोजी महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे दाखल केलेली आहे. सदर मध्यावधी पुर्नविचार याचिकेत आर्थिक वर्ष २०१८-१९ व सन २०१९-२० करिता सरासरी १४.१५% इतकी वीजदर वाढ प्रस्तावित करण्यात आली आहे.

(२) आर्थिक वर्ष २०१६-१७ ते आर्थिक वर्ष २०१९-२० या चार वर्षाच्या नियंत्रण कालावधीकरिता मा. आयोगाने दिनांक ३ नोव्हेंबर, २०१६ रोजी बहुवर्षिय वीजदर आदेश पारित केले असून सदरचे आदेश पारित करताना नियमानुसार सर्व बाबींची पडताळणी करुन विहित कार्यपध्दती अवलंबून आयोगाने दर निश्चित केले आहेत.

(३) आर्थिक वर्ष २०१६-१७ ते आर्थिक वर्ष २०१९-२० या नियंत्रण कालावधीकरिता बहुवर्षिय वीजदर आदेशात मा.आयोगाने रु. ९१४९ कोटी इतक्या महसुली तुटीच्या वसुलीस मान्यता दिली आहे.

(४) अशा आशयाचे पत्र शासनास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(५) महानिर्मिती कंपनीने गेल्या चार वर्षात उष्मादर (हिट रेट) कमी करणे, संयंत्र उर्जा वापर कमी करणे, वित्तीय कर्ज पुनर्बांधणीद्वारे व्याज दर कमी करणे तसेच उपलब्ध कोळशाचा अधिक कार्यक्षम वापर अशा उपायांद्वारे वीज निर्मितीचे दर प्रत्यक्षात कमी करण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

महावितरण कंपनीमार्फत तांत्रिक वीज गळती कमी करण्यासाठी पायाभूत सुविधेची कामे करण्यात येत आहेत व वाणिज्यिक नुकसान कमी करण्यासाठी घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक ग्राहकांची बिलींग कार्यक्षमता (Billing efficiency) वाढविण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित स्वयंचलित मीटर वाचन (एएमआर), कॉमन मिटर रिडींग इन्स्ट्रुमेंट (CMRI) आर.एफ. (रेडिओ फ्रिक्वेनसी), आय.आर. (इन्फ्रा रेड) मीटर व फोटो मिटर रिडींग याचा वापर करण्यात येत आहे, मोबाईल ॲपद्वारे मीटर रिडींगची नवीन संकल्पना राबविण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यात महावितरण कंपनीने वीज पुरवठा खंडीत केल्यामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्याबाबत

(३५) * ११०४८३ श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यात महावितरण कंपनीने गावातील व शेतकऱ्यांच्या कृषीपंपाचा वीज पुरवठा खंडीत केल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला असून पिकांना पाणी देता येत नसल्याने ती सुकून जात असल्यामुळे ठिकठिकाणी रास्ता रोको आंदोलन झाल्याच्या घटना दिनांक ७ जानेवारी, २०१८ रोजी निर्देशनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुष्काळातील वीज बिले माफ करावी, थकित वीज बिले भरण्यासाठी ४ ते ५ महिन्यांची मुदतवाढ मिळावी, तसेच तालुक्यातील प्रलंबित सिंगल फेज योजना सुरू करून गाव डीपीचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवावा अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त मागण्यांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार तालुक्यातील नागरिक व शेतकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याबाबत महावितरण कंपनीने तातडीने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) थकबाकी असलेल्या सार्वजनिक पाणीपुरवठा ग्राहकांचा व "मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना २०१७" चा लाभ न घेतलेल्या थकबाकीदार कृषी ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित करण्याची कार्यवाही महावितरण कंपनीतर्फे करण्यात येत आहे. कृषीपंप वीज जोडण्या खंडित केल्यामुळे दि. ०६ जानेवारी, २०१८ रोजी पंढरपूर-सातारा रस्ता, मौजे उपरी, ता.पंढरपूर येथे सुमारे ४० ते ५० शेतकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन केले होते.

(२) हे खरे नाही.

(३) पंढरपूर तालुक्यातील कृषीपंप ग्राहकाच्या वीज देयकाचे निराकरण करण्यासाठी फिडर निहाय १५ शिबीरे घेण्यात आलेली आहेत. त्यामध्ये एकूण ४० तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सर्व ४० तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात कोळसा टंचाईमुळे बंद पडलेल्या औष्णिक वीज प्रकल्पांबाबत

(३६) * १०५४०० श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी),

श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.अनिल बाबर (खानापूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विजेची मागणी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये १८ हजार मेगावॅटवर गेल्यामुळे तसेच कोळशाची मागणी वेळेवर दाखल न केल्यामुळे कोळसा टंचाई निर्माण होऊन वीज निर्मितीवर परिणाम झाल्याने महावितरणला खुल्या बाजारातून ७२१ मेगावॅट वीज खरेदी करावी लागली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल इंडिया लिमिटेडने कोळशाच्या दरात ९ टक्के वाढ केल्याने राज्यातील विजेचे दर प्रति युनिट २० ते २२ रुपयांपर्यंत पोहचल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) तसेच खासगी कंपन्यांचे सुमारे ४३७० मेगावॅटचे कोळशावर आधारित औष्णिक वीजप्रकल्प ग्राहकांअभावी बंद पडलेले असून त्यांनी केलेली कोट्यावधी रुपयांच्या गुंतवणूकीमुळे आर्थिक दृष्ट्या संकटात असलेले खाजगी वीज प्रकल्प शासनाने ताब्यात घ्यावेत अशी विनंती काही वित्तीय संस्थानी महानिर्मितीकडे केली असून अद्याप त्याबाबत केंद्राकडून कोणतीही सूचना आली नसल्याचे स्पष्टीकरण विभागाने दिले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार कोल इंडिया कंपनीकडे वेळेत कोळशाची मागणी न नोंदवणा-या अधिका-याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच शासनाच्या औष्णिक वीज केंद्राना कोळशाचा सुरळीत पुरवठा होण्याबाबत व ग्राहकांअभावी बंद पडलेले खाजगी कंपन्यांचे औष्णिक वीजप्रकल्प ताब्यात घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) राज्यातील महानिर्मिती कंपनीच्या औष्णिक विद्युत केंद्रांना नियमित कोळसा पुरवठा होण्यासाठी महानिर्मिती कंपनीने केंद्र शासनाच्या अखत्यारितील कोल इंडिया लि. या कंपनीच्या उप कंपन्या डब्ल्यू.सी.एल., एम.सी.एल., एस.ई.सी.एल. आणि सिंगारेनी कोल कंपनी यांच्याशी दीर्घकालीन इंधन पुरवठा करार केलेले आहेत. कोळसा नियोजनासाठी महानिर्मितीकडून कोळसा कंपन्याना प्रत्येक महिन्यासाठी कोळसा मागणी पत्र (Order booking Programme) दिले जाते. कोळसा पुरवठा सुधारण्यासाठी अध्यक्ष, कोल इंडिया लि., सदस्य (वाहतुक), रेल्वे, संचालक (पणन)-डब्ल्यू.सी.एल. व कोल इंडिया लि., अतिरिक्त सचिव व कोळसा सचिव, मंत्रालय, केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सीईए), उपगट समिती तसेच मा. मुख्यमंत्री यांच्या सोबत केंद्रीय कोळसा मंत्रालय, कोल इंडिया लि., केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सीईए), रेल्वे यांचे वरीष्ठ अधिकाऱ्यांसमवेत विविध बैठका घेण्यात आल्यामुळे कोळशाच्या पुरवठयात सुधारणा झालेली आहे.

परंतु राज्यातील वीजेची अधिकतम मागणी डिसेंबर, २०१७ मध्ये १८ हजार मे.वॅ. वर गेली असल्यामुळे महावितरण कंपनीने खुल्या बाजारातून (निविदा व पॉवर एक्सचेंज) माहे डिसेंबर, २०१७ मध्ये काही कालावधीसाठी ५०० ते २१०० मे.वॅ. वीज खरेदी केली आहे.

(२) कोल इंडियाने कोळशाच्या दरात ९% वाढ करण्याचे घोषित केले असले तरी महानिर्मिती कंपनीच्या औष्णिक वीज केंद्रांचे वीज दर मात्र अंदाजे १५ पैसे प्रती युनिट इतकेच वाढण्याची शक्यता आहे.

(३) यासंदर्भात महानिर्मिती व महावितरण कंपनीकडून अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

हुपरी (जि.कोल्हापूर) येथील पंचतारांकीत औद्योगिक वसाहतीतील सिल्व्हर झोनमधील भूखंडास बेकायदेशीररित्या बांधकाम परवाना दिल्याबाबत

(३७) * १११५९२ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हुपरी (जि.कोल्हापूर) येथील पंचतारांकीत औद्योगिक वसाहतीतील सिल्व्हर झोनमधील खुला भूखंड व पायाभूत सुविधांसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने बेकायदेशीररित्या बांधकाम परवाना देण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी फाईव्ह स्टार सिल्व्हर झोन असोसिएशन, हुपरी या संघटनेने मा.उद्योग मंत्री, मुख्य कार्यकारी अधिकारी, औद्योगिक विकास महामंडळ, कार्यकारी अभियंता व औद्योगिक विकास महामंडळ, कोल्हापूर यांच्याकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान तक्रारी दाखल केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रकरणी बेकायदेशीररित्या बांधकाम परवाना देणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई : (१) हे खरे नाही.

महामंडळाच्या विकास नियंत्रण नियमावली, २००९ नुसार औद्योगिक क्षेत्रामध्ये खुल्या जागा व सुविधा क्षेत्र यांचे प्रमाण अनुक्रमे १० टक्के व ५ टक्के ठेवणे आवश्यक आहे. अतिरिक्त असलेल्या खुल्या जागा व सुविधा क्षेत्रांचे रूपांतरण औद्योगिक भूखंडामध्ये करण्याचे अधिकार महामंडळाच्या Minor Modification Committee ला देण्यात आले आहेत. आवश्यकतेनुसार सदर समितीच्या मंजूरीने अतिरिक्त खुल्या जागा व सुविधा क्षेत्रांचे रूपांतर औद्योगिक भूखंडामध्ये करता येते.

(२) दिनांक १६/१/२०१८ रोजी निवेदन दिले असून सदर निवेदनाचे अनुषंगाने महामंडळाचे उत्तर सदर संघटनेस दिनांक २५/१/२०१८ रोजी देण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मनमाड (जि.नाशिक) येथील अतिउच्च दाब उपकेंद्राची क्षमतावाढ करुन व पाटोदा (जि.नाशिक) येथे अतिउच्चदाब उपकेंद्र उभारणेबाबत

(३८) * १०६५१७ श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यामधील विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी मनमाड अतिउच्च दाब उपकेंद्राची क्षमता वाढ करून हे उपकेंद्र २२० के.व्ही. क्षमतेचे करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पाटोदा (ता.येवला, जि.नाशिक) येथे १३२/३३ केव्ही अतिउच्चदाब उपकेंद्र स्थापन करणेसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे व मुख्य अभियंता, महापारेषण यांचेकडे दिनांक १५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार मनमाड अतिउच्च दाब उपकेंद्राची क्षमता वाढ करण्याबाबत व पाटोदा येथे अतिउच्चदाब उपकेंद्र स्थापन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) व (२) होय, हे खरे आहे,

(३) महापारेषण कंपनीच्या १३२ के.व्ही. मनमाड उपकेंद्राची श्रेणीवाढ (Upgradation) करुन सदर ठिकाणी २२० के.व्ही. उपकेंद्र उभारण्यास महापारेषण कंपनीने मंजूरी दिलेली आहे. तसेच पाटोदा परिसरास वीज पुरवठा करणाऱ्या १३२ के.व्ही. येवला उपकेंद्रात बरीच क्षमता शिल्लक असल्याने व पाटोदा ते येवला अंतर कमी असल्याने, पाटोदा येथे अति उच्चदाब उपकेंद्राची सध्या आवश्यकता नाही. तसेच श्रेणी वाढ करण्यात येणाऱ्या मनमाड उपकेंद्रामुळे १३२ के.व्ही. येवला उपकेंद्रास व पर्यायाने त्यावरील ३३ के.व्ही. पाटोदा उपकेंद्र व परिसरास त्याचा लाभ होणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

हिंगोली जिल्हयात एकात्मिक वीज विकास व दिनदयाल उपाध्याय नागरी ग्रामज्योती योजनेची अंमलबजावणी संथ गतीने सुरू असल्याबाबत

(३९) * ११०१९५ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात नागरी वस्त्यांमध्ये सुरळीत व दर्जेदार वीज सेवेसाठी ५२ कोटी रूपयांची सुरू असलेली कामे अत्यंत संथ गतीने सुरू असून या

कामावर नांदेड येथील अधिक्षक अभियंत्याकडून देखरेख ठेवण्यात येत असल्याने व स्थानिक ठिकाणी मनुषबळ कमी पडत असल्याने या कामास विलंब लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगोली जिल्हयासाठी दिनदयाल उपाध्याय योजनेत ७६ नवीन डिपी, २२५ किमी उच्च दाबवाहिनी, १२४.३ किमी लघुदाब वाहिनी, १६ फिडर, ४७ एचडीसी व १० हजार ३०० दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना वीज जोडणी देण्याची २०.२७ कोटीची निविदा ६० टक्के जादा दराने तर आयपीडीएस मध्ये नवीन ८३ रोहित्र, ६७ किमी उच्चदाब वाहिनी, २८.३६ किमी लघुदाबवाहिनी, ८ किमी भूमीगत केबल व एचव्हीडीएसच्या १५ कामांचा समावेश असलेली १८.८३ कोटीची निविदाही ६० टक्के जादा दराने देण्यात आली आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निविदा दिनांक ६ जानेवारी, २०१७ रोजी काढून माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये कार्यारंभ आदेश देण्यात आले असताना आजमितीस १० महिन्यांनंतर २५ टक्केही कामे पूर्ण झालेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यापूर्वी इन्फ्राच्या कामामध्येदेखील कंत्राटदाराकडून विलंब होत असल्याने महावितरणने याप्रकरणी चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार प्रलंबित कामे पूर्ण करण्याबाबत व कामास विलंब करणा-या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हिंगोली जिल्हयात पं.दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना मधील भाग-१ अंतर्गत रु.१७.४१ कोटी, भाग-२ अंतर्गत रु.२१.६८ कोटी व एकात्मिक ऊर्जा विकास योजना भाग-१ अंतर्गत रु.७.९४ कोटी व भाग-२ अंतर्गत रु.२०.१४ कोटी अशी एकूण रु.६७.१७ कोटी इतक्या रक्कमेचे कार्यादेश देण्यात आलेले आहेत. सन २०१७ सालामध्ये लांबलेला पावसाळा, वेळोवेळी येणारे अडथळे तसेच हिंगोली शहरात भूमिगत वाहिनी टाकण्यासाठी नगरपरिषद, हिंगोली यांचेकडून परवानगी अप्राप्त इ. कारणांमुळे सदर कामास विलंब झालेला आहे.

(२) हे खरे नाही.

सदर कामाच्या अनुषंगाने पं. दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना भाग-१ चे कार्यादेश ७.५ टक्के कमी दराने देण्यात आलेले आहेत व एकात्मिक ऊर्जा विकास योजना भाग-१ चे कार्यादेश २.५ टक्के कमी दराने देण्यात आलेले आहेत. तसेच पं. दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना भाग-२ व एकात्मिक ऊर्जा विकास योजना भाग-२ या दोन्हीचे कार्यादेश ७ टक्के जादा दराने देण्यात आलेले आहेत.

(३) पं. दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना मधील भाग-१ ची निविदा दि.२६.०८.२०१६ रोजी काढून दि. २१.११.२०१६ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले व एकात्मिक ऊर्जा विकास योजना भाग-१ ची निविदा दि.२६.०८.२०१६ रोजी काढून दि.२९.११.२०१६ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले. तसेच पं. दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना मधील भाग-२ ची निविदा दिनांक २६.०९.२०१६ रोजी काढून दि. ६.०१.२०१७ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले व एकात्मिक ऊर्जा विकास योजना भाग-२ ची निविदा दि. २७.०९.२०१६ रोजी काढण्यात येऊन दि.०६.०१.२०१७ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. सदर प्रकल्पाची कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्यात येणार आहेत.

(४) व (५) निर्धारित केलेले उद्दिष्ट कंत्राटदाराने विहित वेळेत साध्य न केल्यास त्यास आर्थिक दंड करण्याची तरतूद निविदा दस्ताऐवजामध्ये आहे.

महावितरण व कंत्राटदाराच्या सहमतीने ठरविण्यात आलेल्या उद्दिष्टानुसार कंत्राटदारांनी कामे विहित वेळेत पूर्ण न केल्यामुळे सदर कंत्राटदारास महावितरण कंपनीतर्फे नोटीस टू करेक्ट देण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

शिराळा ग्रोथ सेंटर (जि.सांगली) येथील ई-ब्लॉकमध्ये उद्योगाकरिता मंजूर असलेल्या प्लॉटधारकांना मुलभुत सोयी-सुविधा देण्याबाबत

(४०) * १११६२८ श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिराळा ग्रोथ सेंटर (जि.सांगली) येथील ई-ब्लॉक मध्ये उद्योगाकरिता मंजुर असलेल्या ७० प्लॉटधारकांना प्लॉटकडे जाण्याकरिता रस्ता, वीज व पाणी इत्यादी मुलभूत सोयी-सुविधा एमआयडीसीकडून उपलब्ध करण्यात न आल्यामुळे संबंधित प्लॉटधारक उद्योग उभारु शकले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमआयडीसी प्लॉटधारकांकडून देखभाल शुल्क वसूल करुनही व सदरहू प्लॉट मंजुर होऊन पाच वर्षाचा कालावधी झालेला असतानाही प्लॉटधारकांना प्लॉट परत करण्याच्या नोटीसा एमआयडीसीकडून देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने प्लॉटधारकांना मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई : (१) होय हे खरे आहे.

"इ" ब्लॉक मधील मुलभूत सुविधा देण्याचे काम सुरू आहे.सद्य:स्थितीत रस्त्याचे काम ४० टक्के पूर्ण झाले असून उर्वरित काम एप्रिल, २०१८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

"ई" ब्लॉकमध्ये सद्य:स्थितीत अंतर्गत जलवाहीनी टाकण्याचे काम ८० टक्के पूर्ण झाले असून उर्वरित काम एप्रिल, २०१८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(२) "ई" ब्लॉकमधील सोयी सुविधा पुरविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. महामंडळाच्या धोरणानुसार विहीत कालावधीमध्ये ज्या भूखंडधारकांनी भूखंडाचा विकास करण्याकामी Effective Steps घेतलेल्या नाहीत केवळ त्याच भूखंडधारकांना नोटीस देण्यात आलेल्या आहेत.

तसेच ज्या भूखंडधारकांच्या भूखंडाचा विकास विहीत कालावधी, माहे सप्टेंबर २०१७ पूर्वी संपुष्टात आलेला आहे अशा भूखंडधारकांना माहे सप्टेंबर, २०१८ पर्यंत विनाशुल्क मुदतवाढ देण्यात आली आहे.

(३) "इ" ब्लॉक मधील मुलभूत संविधा देण्याचे काम सुरू आहे. सद्य:स्थितीत रस्त्याचे काम ४० टक्के पूर्ण झालेले असून उर्वरित काम एप्रिल, २०१८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

"ई" ब्लॉकमध्ये सद्य:स्थितीत अंतर्गत जलवाहीनी टाकण्याचे काम ८० टक्के पूर्ण झाले असून उर्वरित काम एप्रिल, २०१८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

हिमायतनगर (जि.नांदेड) येथील शासकीय आदिवासी मुलांच्या वसतीगृहातील विद्यार्थ्यांसाठीचा निधी प्रलंबित असल्याबाबत

(४१) * ११०२०९ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिमायतनगर (जि.नांदेड) येथील शासकिय आदिवासी मुलांच्या वसतीगृहातील विद्यार्थ्यांना प्रथम सत्र संपले तरी अदयापही थेट लाभ हस्तांतरण (डिबीटी) अंतर्गत निधी प्रलंबित असल्यामुळे शालेय व इतर साहित्य मिळालेले नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त वसतीगृहात ९९ विद्यार्थी असून त्यांना चादर,सतरंजी, बेडशीट व शैक्षणिक साहित्य मिळालेले नसल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे ,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वसतिगृहातील विद्यार्थ्यांकरिताचा निधी न देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१), (२), (३), (४) व (५) शासकीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, पुस्तके आणि बेडींग साहित्य (चादर, सतरंजी, बेडशीट इ.) इत्यादीसाठी निश्चित केलेली रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात दोन हप्त्यात जमा करण्यात येते.

आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह, हिमायतनगर, जि.नांदेड येथे एकूण ९९ विद्यार्थी प्रवेशित असून त्यांना देय असलेली रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आलेली आहे.

कासारी (ता.शिरूर, जि.पुणे) गावच्या हद्दीतील सात विद्युत रोहित्रे चोरीला गेल्याबाबत

(४२) * ११३४२८ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कासारी (ता.शिरूर, जि.पुणे) या गावच्या हद्दीतील सात विद्युत रोहित्रे माहे नोव्हेंबर, २०१७ ते माहे जानेवारी, २०१८ या कालावधीत चोरीला गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोहित्रांमधील मौल्यवान तांब्याच्या तारेची चोरी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या विद्युत रोहित्रांमध्ये तांब्याच्या तारे ऐवजी ॲल्युमिनियमची तार बसविण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) व (२) माहे जुलै, २०१७ ते ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत कासारी गाव परिसरातील एकूण ०४ रोहित्रांची चोरी झालेली आहे. माहे नोव्हेंबर, २०१७ ते जानेवारी, २०१८ या कालावधीत अशी घटना घडलेली नाही.

(३) हे खरे नाही.

(४) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, शिक्रापूर येथे वेळोवेळी फिर्याद दाखल करण्यात आली.

तथापि सदर रोहित्र चोरीच्या घटना पुन्हा घडू नयेत याकरिता रोहित्रांच्या टाक्यांना व झाकणांना वेल्डींग करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सावनेर (जि.नागपूर) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या लायसन्सधारकांची थकीत बाजार फी मिळण्याबाबत

(४३) * ११०८६५ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावनेर (जि.नागपूर) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या (कापूस) थेट लायसन्स धारकांची सन २०१४-१५ व २०१५-१६ या दोन वर्षांची ३९ लाख ३८ हजार ०६६ रूपये इतकी फी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांचेकडे थकीत असल्याची माहिती माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सावनेर बाजार समितीने दिनांक ३० मे, २०१६, ४ ऑगस्ट, २०१६, २९ डिसेंबर, २०१६, १५ जुलै, २०१७ व २९ नोव्हेंबर, २०१७ रोजी वेळोवळी पत्र व्यवहार करूनदेखील अद्यापही सदर थकीत रक्कम वसूल करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सावनेर बाजार समितीचे लायसन्स धारकांची दोन वर्षातील थकीत फी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१), (२) व (३) नाही.

बाजार समितीने मागणी केलेल्या रू.३९,३८,०६६/- रक्कमेमध्ये बाजार फी मध्ये कायद्यानुसार प्रक्रियेकरिता सूट देण्यात आलेल्या रू.२९,३३,३५,२६६/- रक्कमेच्या खरेदीचा समावेश होता. त्यामुळे सूट देण्यात आलेली खरेदीची

रक्कम वगळून स्थानिक (Domestic) खरेदी केलेल्या रू.१०,०४,७१,३९५/- यावर फक्त १% या प्रमाणे रू.१०,०४,७१९/- इतकी बाजार फी थेट पणन परवानाधारकांनी पणन मंडळाकडे भरलेली आहे. यापैकी रू.५५,३८०, बाजार समितीस दि.१७/०९/२०१६ रोजी NEFT द्वारे अदा करण्यात आली आहे. बाजार समिती सावनेर यांचेकडे पणन मंडळाचे सन २०१५-१६ व सन २०१६-१७ चे अंशदान रू.२३,०९,५३४/- इतकी थकीत आहे. त्यामुळे बाजार समितीच्या विनंतीप्रमाणे त्यांना देय होणारी बाजार फीची उर्वरित संपूर्ण रक्कम रू.९,४९,३३९/- इतकी बाजार समिती सावनेरच्या अंशदान खाती जमा करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात १८ वीज प्रकल्प बंद अवस्थेत असताना महानिर्मितीने नवीन वीज प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतल्याबाबत

(४४) * ११३६६८ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आधीच १८ वीज प्रकल्प बंद अवस्थेत असताना महानिर्मितीने नवीन वीज प्रकल्पाची उभारणी करण्याचा निर्णय घेतल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आधीच्या १८ बंद असलेल्या वीज प्रकल्पांमुळे सुमारे ३८०० कोटी रुपयांचा आर्थिक भार राज्यातील ग्राहकांवर पडत असताना नवीन वीज प्रकल्प उभारण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या बंद प्रकल्पांना पुन्हा कार्यान्वित करुन ग्राहकांस २४ तास वीज पुरवठा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

चोरपांग्रा व गोवर्धन नगर (जि.बुलढाणा) येथील उघड्या वीज वाहिन्या व फ्यूज पेट्यांची दुरुस्ती करण्याबाबत

(४५) * १०६९७४ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोरपांग्रा व गोवर्धन नगर (जि.बुलढाणा) येथील उघडया असलेल्या वीज वाहिन्या व फ्यूज पेट्यांमुळे मुलांचे व नागरिकांचा जीव धोक्यात असल्याने त्यांची तात्काळ दुरुस्ती करण्याची मागणी विद्युत अभियंता, लोणार यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे दिनांक ५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोणार (जि.बुलढाणा) शहरातील धोकादायक विद्युत तारा व खांबांची दुरुस्ती करावी या मागणीचे निवेदन सहायक अभियंता, विद्युत वितरण कंपनी, लोणार यांना नगर परिषदेच्या पदाधिकारी यांनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे आहे.

याबाबतचा सरपंच, ग्रा.पं. चोरपांग्रा, ता.लोणार यांचा दि. ४ जानेवारी, २०१८ चा तक्रार अर्ज लोणार उपविभाग कार्यालयास प्राप्त झाला आहे.

(२) दि. १४ ऑगस्ट, २०१७ रोजी महावितरणच्या लोणार उपविभागीय कार्यालयास अशा आशयाचे निवेदन उपाध्यक्ष/आरोग्य सभापती, नगरपरिषद लोणार यांचेकडून प्राप्त झाले आहे.

(३) प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने मौजे चोरपांग्रा व गोवर्धन नगर, ता.लोणार येथील व लोणार शहरातील धोकादायक वीज वाहिन्या व उघडया असलेल्या फ्युज पेट्यांची (Distribution Box) दुरुस्ती व देखभाल इत्यादी कामे कंत्राटदारामार्फत करण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

हिंगोली (जि.हिंगोली) तालुक्यातील सोयाबीन अनुदान वाटपात कृषी उत्पन्न बाजार समिती आणि अनुदान समितीने केलेल्या गैरव्यवहाराबाबत

(४६) * ११०६०६ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली (जि.हिंगोली)तालुक्यातील ८ हजार शेतकऱ्यांच्या सोयाबीन अनुदान वाटपात कृषी उत्पन्न बाजार समिती आणि अनुदान समितीने केलेल्या नोंदणीच्या गैरव्यवहारामुळे शेतकऱ्यांचे सुमारे १ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोयाबीन अनुदान वाटपासाठी असलेल्या समितीने एकूण ८ हजार शेतकऱ्यांच्या खात्यावर २ कोटी २१ लाख रुपये जमा करण्याची प्रक्रिया दिनांक २६ डिसेंबर, २०१७ रोजी सुरु केली असतांना कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दररोज मोठ्या संख्येने शेतकरी तक्रार करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सोयाबीन अनुदानापोटी शेतकऱ्यांना २५ क्विंटल मर्यादेपर्यंत २०० रुपयांप्रमाणे ५ हजार रुपये अनुदान मिळणे अपेक्षित असतांना प्रत्यक्षात जेवढे उत्पन्न झाले त्या तुलनेत अनुदान जमा झालेले नसल्याने बहुतांश शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर केवळ ५०० ते ८०० रुपयांपर्यंत अनुदान जमा झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बाजार समितीमध्ये शेतकरी प्रत्यक्ष जावून त्याच्या पट्टीवर असलेली सोयाबीन विक्रीची नोंद दाखवून त्याप्रमाणे पैशाची मागणी करित असल्याने अनेक शेतकऱ्यांनी बाजार समितीच्या पट्ट्या नोंदणी विभागाकडे दिल्या असून, अनुदान यादीत त्यांची नावे आलेली नसल्याने अनेक शेतकऱ्यांना त्यांचे पैसे मिळालेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख : (१) हे अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) हिंगोली जिल्ह्यातील ७९२० मंजूर प्रस्तावाची रक्कम रुपये २.२२ कोटी असून त्यापैकी ७७४४ शेतकऱ्यांना रुपये २.१९ कोटी त्यांच्या बँक खात्यात वर्ग केलेले आहेत.उर्वरित रुपये ३.०२ लाख शेतकऱ्यांचे बँक खाते, IFSC कोड चुकीचा असल्याने अदा करावयाचे बाकी आहेत. सुधारित माहिती प्राप्त झाल्यानंतर उर्वरित रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यावर अदा करण्यात येणार आहे.

अनुदान वाटपाचे काम सुरु असताना ३० शेतकऱ्यांनी अनुदान कमी मिळाल्याची व ५७ शेतकऱ्यांनी सोयाबीन अनुदान यादीत नाव नसल्याची तक्रार बाजार समितीकडे केलेली आहे.
(५) बाजार समितीकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, यांच्या स्तरावर चौकशी अंती योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्हयातील औद्योगिक क्षेत्रातील भूखंड वाटपाविना पडून असल्याबाबत

(४७) * ११०२१९ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयामध्ये एकूण १ हजार ११२ हेक्टर ४ आर इतके औद्योगिक क्षेत्र असून त्यावर १ हजार ३८१ भूखंड पाडण्यात आले आहेत, त्यापैकी १ हजार ९२ भूखंडाचे वाटप झाले असून उर्वरीत २८९ भूखंड अद्याप वाटपाविना पडून असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उर्वरित २८९ भूखंड वाटपाविना पडून राहण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर उर्वरित भूखंड वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) नांदेड जिल्हयामध्ये एकूण ९७८ .११ हे. इतक्या क्षेत्रावर २१११ भूखंड पाडण्यात आले असून त्यापैकी १८०४ भूखंडाचे वाटप करण्यात आले असून उर्वरित ३०७ भूखंड वाटपासाठी उपलब्ध आहेत. नांदेड औद्योगिक क्षेत्रामध्ये एकूण १४ औद्योगिक क्षेत्र असून त्यापैकी ८ औद्योगिक क्षेत्रामध्ये ८० टक्के वाटप झाले आहे. तसेच ८० टक्के पेक्षा कमी वाटप झालेल्या औद्योगिक क्षेत्रामध्ये महामंडळाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे भूखंडवाटपाची कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.